सकाळ




मौदा : सांस्कृतिक कार्यक्रम सादर करताना उपायचे प्रशिक्षणार्थी.

# 'उपाय'ने दिले प्रशिक्षण

**मौदा, ता. १८ :** मौदा तालुक्यात २०१० मध्ये स्थापन झालेल्या 'उपाय' स्वयंसेवी संस्थेने समाजसेवेचे ब्रीद हाती घेऊन देशभरातील शिक्षणापासून वंचित असलेल्या फुटपाथ, बेघर व गरीब मुलांना शिक्षणाच्या मुख्य प्रवाहात आणले आहे. हे काम कायम ठेवण्याचा निर्धार करीत रविवारी मौदा शहरात रॅली काढण्यात आली. याशिवाय राधाकृष्ण हॉलमध्ये जागतिक महिलादिन साजरा करण्यात आला.

एनटीपीसीमधील सहाय्यक व्यवस्थापक वरुण श्रीवास्तव यांनी गावातील गोरगरीब मुलांना, फुटपाथ वरच्या बेघर मुलांना शाळेत दाखला मिळवून दिला. मुलांना कौशल्य विकासाच्या ऑनलाइन प्रशिक्षण, क्रीडा स्पर्धा, वाचनालय यासारखे मोफत शिक्षण व ऑनलाइन प्रशिक्षणापर्यंत कार्य 'उपाय' या संस्थेने हाती घेतले आहे. २०१८ पर्यंत या संस्थेत देशभरात ३६ केंद्र व ३०० स्वयंसेवक मौदा, नागपूर, गुरू ग्राम, पुणे, मुंबई, दिल्ली, बंगळूर येथे १८०० विद्यार्थ्यांना शैक्षणिक सुविधा पुरवित आहेत. मौदा झोनच्या१० केंद्रांमध्ये ६०० मुलांना मोफत प्रशिक्षण दिले जात आहे. प्रावीण्य मिळविलेल्या विद्यार्थी व कर्तृत्ववान महिलांचा यावेळी सत्कार उपायने केला.

कार्यक्रमाला प्रमुख पाहुणे म्हणून एनटीपीसी मौद्याचे आलोक गुप्ता आणि एनटीपीसीच्या समृद्धी लेडीज क्लबच्या अध्यक्ष अर्चना आलोक गुप्ता, नगरपंचायत तृप्ती निमजे, विनय चौधरी, मौदा झोनल डायरेक्टर अंकित बागला, मनोज गावंडे, डफर सर, केशव स्वामी संस्थेचे उपाध्यक्ष बाबासाहेब सावनेरकर, अरविंद बाळबुधे, पुरुषोत्तम डोरले, रघुनाथ सहारे, शैलेश रोशनखडे, अभिषेक राऊत उपस्थित होते.

Nagpur, Nagpur-Today
19/03/2019 Page No. 4